अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई—३०
दुरध्वनी क्र.— ०२२—२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— ०९/१०/२०२४

**—: प्रेसनोट :—**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ३०/२०२४ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. महेंद्र वासुदेव सावर्डेकर, ४४ वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक - आर्थिक गुन्हे शाखा, युनिट-८, मुंबई |
| लाचेची मागणी | गुंतवणूकीच्या १० टक्के (रू. ४,९०,०००/-) |
| स्विकारलेली रक्कम | रु. २,००,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे मुळचे तामिळनाडू येथील रहिवाशी असून त्यांनी ब्लिस कन्संलटन्सी या कंपनीमध्ये रू. ४९,४४,१७०/- एवढया रक्कमेची गुंतवणूक केली होती. नमूद कंपनीने फसवणूक केल्याने कंपनीच्या विरूध्द आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ३४/२०२३ कलम ४२०, ४०९, ३४ भादवि सह कलम ३, ४ एम.पी. आय.डी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून लोकसेवक हे तपासी अधिकारी होते. लोकसेवक यांनी नमूद गुन्हयात तक्रारदार यांनी गुंतविलेल्या रक्कमेबाबत त्यांचा साक्षीदार म्हणून जबाब नोंदविणेकामी व त्यांची कागदपत्रे गुन्हयात सामील करणेकामी तक्रारदार यांनी गुंतविलेल्या रक्कमेच्या १० टक्के रक्कमेच्या लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०८/१०/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रारअर्ज दिला.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी नमूद कंपनीत गुंतविलेल्या रक्कमेच्या १० टक्के (रू.४,९०,०००/-) लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानुसार दिनांक ०९/१०/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून रू. २,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून लोकसेवक श्री. महेंद्र वासुदेव सावर्डेकर, पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, युनिट ८, मुंबठ यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. गणेश सुर्यवंशी, पो.नि. पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोलफ्री** **क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net